जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ६०१ दिनांक - ०७/०८/२०२३**

## पर्वती पोलिस स्टेशन पुणे शहर

## अल्पवयीन मुलाचा खुनाचा प्रयत्न करणारे एकुण पाच आरोपी यांना शिताफीने केले जेरबंद

दिनांक ०५/०८/२०२३ रोजी पानमळा वसाहत सिंहगड रोड येथे एका अल्पवयीन मुलाच्या खुनाचा प्रयत्न केल्याबाबत **पर्वती पो स्टे येथे गु.र.नं.२३४/२०२३,भा.द.वि.कलम ३०७,३२६,१४३,१४७,१४८,१४९,५०६,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महा.पोलीस अधि.कलम ३७(१)१३५** प्रमाणे गुन्हा दाखल होता. दाखल गुन्हयांचा गंभीर प्रकार लक्षात घेवुन वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी आरोपींचा शोध तात्काळ घेणेकामी पर्वती पोलीसांना आदेशीत केले होते.

त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.जयराम पायगुडे पर्वती पोलीस यांचे मार्गदर्शनाखाली पर्वती पोलीस ठाणेचे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी,सुनिल जगदाळे व तपास पथक कर्मचारी आरोपींचा शोध घेत असताना **पोलीस अंमलदार,कुंदन शिंदे, सद्दाम शेख, प्रकाश मरगजे** यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की, गुन्हयांतील सहभागी आरोपी हे पुणे-सातारा रोड लक्ष्मी नारायण टॉकिज शेजारील उड्डाण पुलाखाली पर्वती दर्शन येथील सार्वजनिक पर्किंग मध्ये कोठेतरी पळुन जाण्याच्या तयारीत थांबलेले आहेत. सदरची बातमी वरिष्ठांना कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली व्यवस्थीत सापळा रचुन,आरोपी पळुन जाण्यापुर्वी त्यांना ताब्यात घेतले. त्यांनी त्यांची नावे **१)अरुण रोहिदास चंदनशिवे,वय-४७ वर्षे,रा.फ्लॅट नं.१०५/६,मॅपल रेसिडन्सी,धायरेश्वर मंदीरासमोर,धायरी,पुणे २)अशोक रोहिदास चंदनशिवे,वय-४८ वर्षे,रा. फ्लॅट नं.१०५/६मॅपल रेसिडन्सी,धायरी पुणे ३)विकी कुमार चंदनशिवे ऊर्फ राज,वय-३२ वर्षे,रा.मयुर अपार्टमेंन्ट फ्लॅट नं.१०२ बेनकरवस्ती,धायरीपुणे ४)कुणाल कृष्णा सावंत,वय-२४ वर्षे,रा.खेडकर कॉर्नर, साईशांती ॲव्हेन्यु फ्लॅट नं.४०७,न-हे,पुणे ५)प्रसिक ऊर्फ रणजित उत्तम कांबळे,वय-३२ वर्षे,रा.सर्वे नं. १३१/१,पानमळा वसाहत,सिंहगड रोड,पुणे** अशी असल्याचे सांगितले.

तसेच फिर्यादी अल्पवयीन मुलाचे मामाचे १० वर्षापुर्वीच्या झालेल्या खुनातुन अशोक व अरुण चंदनशिवे यांची सुमारे ०६ वर्षापुर्वी निर्दोष सुटका झाल्याने,अल्पवयीन फिर्यादी हा आरोपीचे नातेवाईकांना त्रास देत असल्याचा संशय त्यांना आल्याने,त्या रागातुन आरोपींनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केल्याने,त्यांना नमुद गुन्हयांत अटक करण्यात आली आहे. गुन्हयांत आणखीण कोण सामील आहे काय आणि गुन्हयांचा मुळ उद्देश काय होता,याचा सखोल तपास पर्वती पोलीस ठाणे कडील पोलीस उप-निरीक्षक,सुनिल जगदाळे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,मा.प्रविणकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त,परि-०३,पुणे,श्री.सुहेल शर्मा, मा.सहा.पोलीस आयुक्त,सिंहगड विभाग,पुणे,श्री.अप्पासाहेब शेवाळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.जयराम पायगुडे व पोलीस निरिक्षक,(गुन्हे),श्री.विजय खोमणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक,सुनिल जगदाळे,पोलीस अंमलदार,कुंदन शिंदे,प्रकाश मरगजे,अमित सुर्वे,सद्दाम शेख, दयानंद तेलंगे-पाटील,नवनाथ भोसले प्रमोद भोसले,प्रशांत शिंदे,अनिस तांबोळी,पुरुषोत्तम गुन्ला, किशोर वळे,अमित चिव्हे,अमोल दबडे यांनी केली आहे.